**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ विनियम ४
मधील प्रस्तावित फेरबदलाची कलम ३७(१कक)
खालील सूचना

## महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग**

**क्रमांक :- टिपीबी** ४३१५ / **११६३**/प्र.क्र.१८६/२०१५ / **नवि-**११

**मंत्रालय, मुंबई** :४०० ३२,

**दिनांक – ५ जून, २०१७.**

**शासन निर्णय :** सोबतची मराठी व इंग्रजी सूचना शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( श्रीरंग दि. लांडगे )
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.**
**मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव.**

**प्रति,**

(१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
(२) आयुक्त, बृहन्मुंबई महागनरपालिका.
(३) व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कार्पोरशन.
(४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
(५) सह सचिव, तथा संचालक, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
(६) उप संचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.

२/- सदर सूचना शासनाच्या दिनांक १३.९.२०१० रोजीच्या परिपत्रकातील निदेशानुसार व खालीलप्रमाणे जाहिरात म्हणून प्रसिध्द करुन घेणेबाबत सत्वर कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| १) | जाहिरात देणा-या कार्यालयाचे नांव | नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२. |
| २) | जाहिरात कोणत्या दिनांकास द्यावयाची आहे | तात्काळ |
| ३) | प्रसिध्दीचे स्वरुप | स्थानिक |
| ४) | कोणत्या जिल्हयामध्ये | बृहन्मुंबई महागनरपालिका क्षेत्रामध्ये |
| ५) | किती वृत्तपत्रात | एका मराठी व एका इंग्रजी वृत्तपत्रात |
| ६) | वृत्तपत्राचे नांव | सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्रात |

| | | |
|---|---|---|
| ७) | किती वेळा | एकदा |
| ८) | जाहिरात खर्चाचे देयक कोणत्या अधिकाऱ्याकडे पाठवावयाचे त्या कार्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता | व्यवस्थापकीय संचालक,<br>मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन,<br>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची इमारत, बांद्रा-कुर्ला संकुल,<br>बांद्रा(पूर्व) ४०० ०५४ |

(७) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय सूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या १० प्रती नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ व उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)

(८) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग (त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी)

(९) निवड नस्ती (नवि-११)

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

**Proposed Modification to Regulation 4 of DCR for Gr. Mumbai, 1991 under section 37(1AA)**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
**Mantralaya, Mumabi 400 032.**
**Dated : 5th June 2017.**

## NOTICE

**No. TPB 4315/1163/CR-186/2015/UD-11:**

Whereas the Development Control Regulations for Greater Mumbai, 1991 (hereinafter referred to as "the said Regulations") have been sanctioned by the Government in the Urban Development Department, under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No. DCR 1090/RDP/UD-11 dated 20th February, 1991 so as to come into force with effect from the 25th March, 1991;

And whereas, Regulation 4 of the said Regulations deals with Development Permission and Commencement certificate, in which items of operational construction by some authorities are excluded from Development Permission;

And whereas, the Mumbai Metro Rail Corporation, a special purpose vehicle company of Mumbai Metropolitan Region Development Authority vide letter dated the 26.10.2015, requested to the State Government to initiate modification to the Regulation 4 of the said Regulations, to include operational constructions of Metro Rail in the list of excluded operational constructions;

And whereas, the Govt. in Urban Development Department, in view of the aforesaid request, is of the opinion that in the public interest it is necessary to carry out urgently a suitable modification accordingly to the Regulation 4 of the said Regulations, which is more specifically described in the schedule appended hereto (hereinafter referred to as "the proposed modification");

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by sub-section (1AA) of Section 37 of the

said Act, and all other powers enabling it in this behalf, the Government hereby publishes a Notice for inviting suggestions and objections from any person with respect to proposed modification, as required by clause (a) of sub-section (1AA) of the Section 37 of the said Act, within a period of one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette.

Any objections/ suggestions in respect of the proposed modification may be forwarded before the expiry of one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette, to the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001. Any objection or suggestion, which may be received by the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai within the said period shall be dealt with in accordance with the provisions of the said sub-section (1AA) of Section 37 of the said Act.

This Notice shall also be available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in

**By order and in the name of Governor of Maharashtra,**

**( Kishor D. Girolla)**
**Under Secretary to Government.**

## SCHEDULE

**( Accompaniment to Notice No. TPB 4315 /1163/ CR-186/ 2016 / UD-11, dated 5th June, 2017)**

**1)In clause (2) of Regulation 4, the following Sr. No. 'x' is proposed to be added after Sr.No. 'ix'**

x. Metro Rail Administration (MRA) /Project Implementing Agency designated by the Government for the Metro rail and Mono rail/Light Rail Transit (LRT) Projects.

**2) In sub-clause (ii) of clause (3) of Regulation 4**,

a) For the words "**In case of the Railways**" the words "**In case of the Railways/Metro and Mono rail/LRT Authority** " is proposed to be inserted.

b) After Sr. No.(c), the following new proviso is added as **(d)**

(d) Operation Control Centre, Playback Training Room, Administration Building, Stabling Yards, Maintenance Workshop and Training Centre, Auto Car Wash Plant and Auto Wash Plant, Auxiliary Rail Vehicle Building, Under Floor Wheel Lathe and Blow Down Plant, Cooling Tower, Generator Area, Auxillary Substation, Traction Substation, Transformer Area, Water Treatment Plant, Waste Water Treatment Plant, Depot Control Centre, sump area, Parking, Check post, Loading and unloading areas, Fouling Points, DG set Rooms, Metro and Mono stations (underground and elevated), Viaduct and tunnel, Ventilation Shaft, Entry / Exit Blocks, Passages, Underground passage to Station box, Lifts, Staircases, Escalators, Transit accommodation / Guest house / Guest rooms, Air Handling Unit, Fire staircase, Fire lift and fire passages, Refuge area, thereto.

**( Kishor D. Girolla)**
**Under Secretary to Government.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ विनियम ४ मधील प्रस्तावित फेरबदलाची कलम ३७(१कक) खालील सूचना ............

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
दिनांक - ५ जून २०१७ .

## सूचना

**क्रमांक :- टिपीबी ४३१५/११६३/प्र.क्र.१८६/२०१५/ नवि-११**

ज्याअर्थी, बृहन्मुंबई क्षेत्राची विकास नियंत्रण नियमावली (यापुढे याचा उल्लेख "उक्त विनियम " असा करण्यात आला आहे.), शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. डिसीआर / १०९०/आरडीपी/ नवि-११, दि. २० फेबुवारी १९९१ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) च्या कलम ३१(१) खालील तरतूदीनुसार मंजूर झालेली असून दि. २५.३.१९९१ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विनियमाच्या विनियम ४ हा विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्राच्या तरतूदीसंदर्भात असून त्यामध्ये काही प्राधिकरणांची विशिष्ट बांधकाम कार्ये ही विकास परवानगीमधून वगळण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विशेष हेतू वाहन कंपनीने दिनांक २६.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मेट्रो रेल्वेची कार्ये ही विकास परवानगीमधून वगळणेच्या बांधकाम कार्याच्या यादीमध्ये समाविष्ट करणेसाठी उक्त विनियमाच्या विनियम ४ मध्ये सुधारणा करणेची विनंती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, सदर विनंती विचारात घेता, सार्वजनिक हितास्तव उक्त विनियमाच्या विनियम ४ मध्ये तातडीने उचित सुधारणा करणेसाठी यासोबतच्या परिशिष्टामध्ये उल्लेखिलेप्रमाणे फेरबदल (यापुढे याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा केलेला आहे) करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झालेले आहे ;

आता त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन, शासन याद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम (१कक) चे खंड(क) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून सदरची सूचना शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून एक महिन्याचे मुदतीमध्ये सूचना/हरकती मागविण्यासाठी, सूचना प्रसिध्द करीत आहे.

शासनाकडून असेही कळविणेत येत आहे की, प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती/सूचना शासन राजपत्रात सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचेकडे इन्सा हटमेंटस, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१ या कार्यालयाचे पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांच्याकडे सदरच्या कालावधीत प्राप्त होणा-या हरकती/सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७च्या पोट कलम (१कक) अन्वये कार्यवाही करण्यात येईल;

सदर फेरबदलाची सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( किशोर द. गिरोल्ला )**
**शासनाचे अवर सचिव.**

## परिशिष्ट

(सूचना क्र. टिपीबी ४३१५/११६३/प्र.क्र.१८६ /२०१५/नवि-११ दिनांक ५ जून २०१७ सोबतचे परिशिष्ट )

**1)<u>In clause (2) of Regulation 4, the following Sr. No. 'x' is proposed to be added after Sr.No.ix</u>**

x. Metro Rail Administration (MRA) /Project Implementing Agency designated by the Government for the Metro rail and Mono rail/Light Rail Transit (LRT) Projects.

2) **<u>In sub-clause (ii) of clause (3) of Regulation 4</u>**,

a) For the words "**In case of the Railways**" the words "**In case of the Railways/Metro and Mono rail/LRT Authority** " is proposed to be inserted.

b) After Sr. No.(c), the following new proviso is added as **(d)**

(d) Operation Control Centre, Playback Training Room, Administration Building, Stabling Yards, Maintenance Workshop and Training Centre, Auto Car Wash Plant and Auto Wash Plant, Auxiliary Rail Vehicle Building, Under Floor Wheel Lathe and Blow Down Plant, Cooling Tower, Generator Area, Auxillary Substation, Traction Substation, Transformer Area, Water Treatment Plant, Waste Water Treatment Plant, Depot Control Centre, sump area, Parking, Check post, Loading and unloading areas, Fouling Points, DG set Rooms, Metro and Mono stations (underground and elevated), Viaduct and tunnel, Ventilation Shaft, Entry / Exit Blocks, Passages, Underground passage to Station box, Lifts, Staircases, Escalators, Transit accommodation / Guest house / Guest rooms, Air Handling Unit, Fire staircase, Fire lift and fire passages, Refuge area, thereto.

**( Kishor D. Girolla)**
**Under Secretary to Government.**